सं.फौ.ख.क्र. १७/२०२०
निशाणी क्र. १३

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. १ यांचा सरतपास शपथेवर.**

**नाव:** काळुराम पांडूरंग दळवी
**वय:** ३७ वर्षे, **व्यवसाय:** शेती,
**पत्ता:** मौजे अंथुर्णे, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील ॲड श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

दिनांक १५/१०/२०१९ रोजी मी जंक्शन येथे चाललो होतो. जंक्शन पोलिस स्टेशनच्या जवळ सर्कल ऑफिसच्या आसपास गर्दी दिसल्याने मी त्या ठिकाणी गेलो. त्या ठिकाणी वाहने थांबल्याचे दिसून आले. पोलिस मला म्हणाले की, सही करा म्हणून मी सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावरील मजकूर मला माहित नाही. पोलिसांनी त्यातील मजकूर मला वाचून दाखविला नव्हता. सहीस **निशाणी क्र. १४** देण्यात येते.

(सदर साक्षीदार अभियोगपक्षास पुराव्याकामी मदत करीत नसल्याने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी मागितली. विनंतीवरून भारतीय पुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे परवानगी देण्यात येते.)

**उलटतपास सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/१०/२०१९ रोजी १९:२० वाजताच्या सुमारास मी त्या ठिकाणाहून चाललो असताना दुसरे पंच शब्बीर मुलाणी आणि पोलिस हवालदार श्री. माने हे होते. हे म्हणणे खरे नाही की, भगवान देशमाने यांनी पोलिसांना घटनास्थळ पंचनामा दाखवित होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी घटनास्थळी अपघातग्रस्त पिकअप क्र. एम. एच. १२ ए. क्यू. ७७४६ आणि सुमो जीप क्र. एम. एच. ४२ के. ०५०७ ही वाहने आढळून आली व त्याचे नुकसान झाले असल्याचे दिसून आले. वरील मजकूरास अधोरेखांकित भाग 'अ' म्हणून संबोधण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की, दिसत्या परिस्थितीचा पोलिसांनी माझ्यासमक्ष पचंनामा तयार केला आणि त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी बारकाईने पाहिणी केल्यावर रस्त्यावर टायरचे व्रण दिसून येत होते. माझे इयत्ता १० वी शिक्षण झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला लिहिता,

**सं.फौ.ख.क्र. १७/२०२०**
**निशाणी क्र. १३**

वाचता येते. हे म्हणणे खरे आहे की, मी वाचल्याशिवाय कोणत्याही कागदावर सही करत नाही. हे मला आठवत नाही की, ही सही करण्याकरिता पोलिसांनी माझ्यावर कोणतिही धाक व दडपशाही वापरली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी समजून, उमजून, वाचून पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणून असे काही घडले नाही असे कथन करित आहे.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. बी. डी. शिंगाडे यांच्यामार्फत**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, मी जाण्यापूर्वी पोलिसांनी लिहिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलिसांनी मला सांगितले यावर सही करा म्हणून मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलिसांनी वाचून दाखविले नव्हते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2024.06.19 17:25:05 +0530

ठिकाण इंदापूर (जे. एन. भस्मे)
दिनांक १९/०६/२०२४ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इंदापूर.